दि. ३०/०१/२०२५.

विद्युत विभागातील सर्व माजी विद्यार्थी

आपल्या विभागाच्या सर्व माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा रविवार दिनांक ९ फेब्रुवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी आपण सर्वांनी आवर्जुन उपस्थित रहावयाचे आहे .

गेल्या अनेक वर्षापासून असा मेळावा घेणे नियोजित होते परंतु संस्थेमध्ये सातत्याने सुरू असणारे उपक्रम व शैक्षणिक कार्यभारामुळे ते शक्य होऊ शकले नाही .

माजी विद्यार्थ्यांच्या सहभागाने विद्यार्थ्यांना, संस्थेला व विभागाला अनेक मार्गांनी सहकार्य होऊ शकते . विद्यार्थ्यांना कंपनीमध्ये नोकरी मिळणे त्यांना विविध पर्याय सुचविणे. यामध्ये आपले मोलाचे मार्गदर्शनही होईल या उद्देशाने हा मेळावा आयोजित केला आहे म्हणून हे आग्रहाचे निमंत्रण.

मेळावा रविवार दिनांक ०९/०२/ २०२५ रोजी आयोजित केला आहे परंतु त्याचे संपूर्ण नियोजन करणे करिता मेळाव्यासाठी माजी विद्यार्थ्यांची संख्या जोपर्यंत समजत नाही तोपर्यंत नियोजन करणे अवघड़ जात आहे . त्या करिता आपणास सर्वांना आवाहन करणेत येते कि तातडीने रजिस्ट्रेशन प्रक्रीया पूर्ण करावी. या कार्यक्रमाची रूपरेषा सोबत जोडली आहे. आपले रजिस्ट्रेशन दि. ६/२/२०२५ पर्यंत पूर्ण करावे.

आपला स्नेहांकित,

श्रीकांत एम. नाईक.
विभाग प्रमुख विद्युत अभियांत्रिकी
शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर.